
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | बुधवार, 1 जुलै 2026 | अंक क्र. 57 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# परळी औष्णिक वीज केंद्रात 'बदल्यांचा सर्जिकल स्ट्राईक'
# एकाच वेळी १९ अधिकाऱ्यांच्या बदल्या !

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील कार्यकारी अभियंत्यासह विविध महत्त्वाच्या पदांवरील तब्बल १९ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश मंगळवारी जारी करण्यात आल्याने प्रकल्प परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या जागी अद्याप एकाही नव्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली नसल्याने प्रकल्पाच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी, परळी औष्णिक प्रकल्पाच्या भवितव्याबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

महानिर्मितीच्या परळी औष्णिक वीज केंद्रात गेल्या काही वर्षांपासून वीज निर्मितीची घट, जुन्या यंत्रणांची अवस्था आणि प्रकल्पाच्या भवितव्याबाबत वेळोवेळी चर्चा होत असतानाच आता मोठ्या प्रमाणावर झालेल्या बदल्यांनी या चर्चेला अधिकच खतपाणी घातले आहे. कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, रसायनशास्त्रज्ञ, सुरक्षा अधिकारी आदी विविध संवेदनशील पदांवरील अधिकारी इतर औष्णिक, जल आणि पवन ऊर्जा प्रकल्पांकडे हलविण्यात आले आहेत.

प्रशासकीय आदेशानुसार अधिकाऱ्यांची उरण वायू वीज केंद्र, तसेच भुसावळ, चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, पारस, पोफळी, वैतरणा, नाशिक आणि मुंबई येथील विविध प्रकल्पांमध्ये बदली करण्यात आली आहे. मात्र, त्यांच्या जागी कोणतीही तत्काळ नियुक्ती न झाल्याने प्रकल्पातील मनुष्यबळावर ताण वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

एकाच आदेशात एवढ्या मोठ्या प्रमाणावर अधिकारी बाहेर गेल्याने परळी औष्णिक प्रकल्पातील प्रशासकीय आणि तांत्रिक कामकाजावर त्याचा नेमका काय परिणाम होणार, याकडे कर्मचाऱ्यांसह ऊर्जा क्षेत्राचे लक्ष लागले आहे. बदल्यांच्या पार्श्वभूमीवर प्रकल्पातील पुढील नियोजनाबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, मात्र, एकाचवेळी १९ अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि त्याचवेळी नव्या नियुक्त्यांचा अभाव यामुळे परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या भविष्यातील कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, महानिर्मितीकडून याबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



### बदल्यांमध्ये यांचा आहे समावेश

■ परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील बदल्यांमध्ये शमिना अर्जुमन रफिक उल इस्लाम (कार्यकारी अभियंता), संदीप भिमराव कुंदे, भूषण गंगाधर मेश्राम (अतिरिक्त कार्यकारी अभियंते), सुनिल ज्ञानोबा पवार (व्यवस्थापक), शशिकांत इंगवले, धीरज राजेशिर्के, पवन रोकडे, निलेश गिरीपुंजे, अश्विन यादव (उपकार्यकारी अभियंते), संजय गुजराथी, ज्योती नवनागे (सहाय्यक अभियंते), अविनाश जाधव, सूर्यकांत मदने (सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ), अर्जुन नागरगोजे, विशाल मुंडे, गोविंद नागरगोजे (कनिष्ठ रसायनशास्त्रज्ञ), रणजीत पाटील (कनिष्ठ सुरक्षा अधिकारी), ज्ञानेश्वर घोंगे (प्रभारक-श्रेणी १) आणि मोहित खालकर (वाहक-नि-अग्नियंत्र) यांचा समावेश आहे.

### हा नियमित प्रक्रियेचा भाग: मुख्य अभियंता

■ या संपूर्ण गोंधळावर आणि कर्मचाऱ्यांमधील चिंतेवर पडदा टाकण्याचा प्रयत्न करताना परळी औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे म्हणाले, "या बदल्यांमागे कोणताही वेगळा हेतू किंवा संकट नाही. हा केवळ नियमित प्रशासकीय प्रक्रियेचाच एक भाग आहे. तसेच, काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वतःच्या विनंतीवरून या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कुणीही याचा वेगळा अर्थ काढू नये."

# नोकरीच्या आमिषाने म्यानमार मध्ये ओलिस ठेवलेल्या बीड जिल्ह्यातील तरुणासह महाराष्ट्रातील तरुणांची सुटका करा : धनंजय मुंडेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**केंद्र सरकारच्या मदतीने सर्वांची सुरक्षित सुटका करण्याची मुंडेंची विनंती**

**तरुणांना फसवून मानवी तस्करी करणाऱ्या महाराष्ट्रातील एजंटांच्या जाळ्याचा शोध घेऊन कठोर कारवाई करा**

**मोठ्या पगाराचे आमिष दाखवत तरुणांची आंतरराष्ट्रीय तस्करी आणि जबरदस्तीने सायबर गुन्हे घडवणारे रॅकेट**

■ मुंबई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील नांदूर घाट येथील रहिवासी स्वप्नील काळुंके यांसह अनेक तरुणांना मोठ्या पगाराचे आमिष दाखवून म्यानमार - थायलंड सीमेवर एका छळ छावणीत ओलिस ठेऊन त्यांच्या कडून जबरदस्तीने सायबर गुन्हे घडवले जात असल्याचे समोर आले असून, या प्रकरणी राज्य शासनाने गंभीर दखल घेत केंद्र सरकारच्या मदतीने या सर्व तरुणांची सुखावून सुटका करावी, अशी मागणी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी लेखी पत्राद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री महोदयांची विधानभवन येथे भेट घेत विनंतीचे पत्र दिले आहे.

बीड जिल्ह्यातील स्वप्नील काळुंके सह महाराष्ट्रातील विविध ठिकाणचे २०-२५ तरुण तर देशातून तब्बल ७००-८०० तरुण म्यानमार - थायलंड सीमेवरील गोल्डन ट्रँगल नामक छळछावणीत ओलिस असून त्यांना शारीरिक यातना देऊन त्याच्याकडून सायबर गुन्हे घडवले जात असल्याची तक्रार बीड सायबर पोलिसात दाखल करण्यात आलेली आहे, तसेच याप्रकरणी तपासाची चक्रे थेट देशाच्या गुप्तचर विभागापर्यंत पोचले असून, आपला बचाव व सुटका होण्यासाठी ही सर्व तरुण प्राणांची बाजी लावत असून सध्या ते मृत्यूच्या दाढेत असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी तातडीने लक्ष घालून केंद्र सरकार तसेच विदेश मंत्रालयाची मदत घेऊन या तरुणांच्या सुखरूप सुटकेसाठी प्रयत्न सुरू करावेत तसेच मोठ्या पगाराचे आश्वासन देऊन सोशल मीडियाच्या माध्यमातून जाळे विणून आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी तस्करी करणाऱ्या या टोळीतील महाराष्ट्रामध्ये सक्रिय असणाऱ्या एजंटांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अंबाजोगाई पोलिसांचा पुढाकार; कोचिंग क्लास चालकांना दिल्या महत्तवाच्या सूचना

■ अंबाजोगाई प्रतिनिधी:-




विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनतर्फे शहरातील सर्व कोचिंग क्लास चालकांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक दि. २९ जून २०२६ रोजी दुपारी १ ते २ या वेळेत अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे पार पडली.

ही बैठक जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या सूचनेनुसार तसेच अप्पर पोलीस अधीक्षक चेतना मॅडम आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली.
विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना, शासनाच्या नियमांचे पालन आणि कोचिंग क्लासमधील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने विविध महत्त्वाच्या सूचनांची माहिती यावेळी देण्यात आली.

बैठकीत क्लास चालकांना सर्व आवश्यक शासकीय परवाने वैध ठेवणे, इमारतीचे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र उपलब्ध ठेवणे, अग्निसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करणे, वर्गखोल्यांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश न देणे, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग (इमर्जन्सी एक्झिट) कायम अडथळामुक्त ठेवणे, स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे, परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून किमान एक महिन्याचे रेकॉर्डिंग जतन करणे, विद्युत यंत्रणेची नियमित तपासणी करणे आणि वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्था ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय महिला विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना करणे, संशयास्पद हालचाल किंवा व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देणे, विद्यार्थ्यांच्या येण्या-जाण्याची नोंद ठेवणे, प्रथमोपचार पेटी व आपत्कालीन संपर्क क्रमांक उपलब्ध ठेवणे तसेच छेडछाड, रॅगिंग, सायबर गुन्हे किंवा सोशल मीडियावरील त्रासाच्या घटना त्वरित पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्याचे आवाहनही केले विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसून सर्व कोचिंग क्लास चालकांनी शासनाच्या नियमांचे व पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले. सुरक्षित, शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असेही यावेळी सांगण्यात आले.

अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनतर्फे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी भविष्यातही अशा जनजागृतीपर व प्रतिबंधात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.


# ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सूचनेवरून
## परळी वैजनाथ विधानसभा मतदार संघातील भाजपच्या 363 बीएलए-2 चे फॉर्म तहसीलदारांकडे सादर

■ परळी वैजनाथ (प्रतुनिधी)

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सूचनेनुसार SIR प्रक्रिये साठी परळी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीच्या च्या वतीने परळी मतदार संघातील सर्वच 363 बूथ वरील BLA-2 चे फॉर्म आज तहसीलदार विनोद रणवरे व नायब तहसीलदार पठाण मॅडम यांच्याकडे अधिकृतपणे सादर करण्यात आले.

यावेळी परळी नगरपालिकेचे बांधकाम सभापती, भाजपाचे BLA- 1 विधानसभा प्रमुख प्रा पवन मुंडे, भारतीय जनता पार्टी SIR चे विधानसभा समन्वयक पाळवदे विकास, दयाराम आघाव, सोमनाथ कांगणे आणि धनराज गीते आदी उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करण्यासाठी व मतदार संपर्क अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा ठरला,परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील मतदार पुनरीक्षण कार्यक्रम भाजपच्यावतीने प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. पक्षाचे बुथप्रमुख,प्रत्येक बूथ चे BLA 2 , शक्तीप्रमुख, केंद्र प्रमुख आणि सर्वच पदाधिकारी या राष्ट्रीय कार्यात सहभागी झाले असल्याचे विधानसभा BLA- 1 प्रा पवन मुंडे यांनी सांगितले.



## संपादकीय

# मेहनतीशिवाय यश नाही

विद्यार्थ्यांचे यश केवळ परीक्षेतील गुणांवर अवलंबून नसून आत्मविश्वास, नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोन यावरही तेवढेच अवलंबून असते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण मेहनत, पालक-शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध दिनचर्या अंगीकारल्यास प्रत्येक विद्यार्थी यशाचे शिखर गाठू शकतो.

उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सुरू होऊन आजचा तेरावा दिवस आहे. विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे आवश्यक आहे. तरच तो विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकतो. त्यासाठी त्यांच्या मनात स्वत:चा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. तो आत्मविश्वास पालक आणि शिक्षकवर्गांने निर्माण करायला हवा. विद्यार्थ्यांच्या जीवनात पालक आणि शिक्षक अधिक जवळचे असतात. त्यामुळे त्यांची आवडनिवड व सवय त्यांना माहीत असते. बरेच विद्यार्थी परीक्षेपर्यंत बेसावध असतात. परीक्षा जवळ आली की, रात्रीचा दिवस करून अभ्यासाला लागतात. याचा परिणाम विद्यार्थ्यांचे मन विचलित होते. पुढे काय करावे त्यांनाच समजत नाही. त्यांच्या मनावरील दडपण वाढते. याचा परिणाम त्याला कमी गुण किंवा त्या परीक्षेत अपशय येऊ शकते. यासाठी मुलांनी विद्यार्थी म्हणून यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत. तसेच अभ्यासामध्ये नियमित सातत्य ठेवावे लागेल. कठोर परिश्रम आणि अभ्यासात सातत्य ठेवण्यासाठी अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन करावे लागेल. त्यांनी या तीन गोष्टी पाळल्या, तर परीक्षेत उत्तम गुण मिळू शकतात.

आपण सहज परीक्षेत यश संपादन करू शकतो असे जरी विद्यार्थ्यांना वाटत असले तरी तितके ते सोपे नसते. मुळात त्याला शिकण्याची आवड पाहिजे. म्हणजे तो पुढे काहीतरी करू शकतो. खरे म्हणजे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाल्यावर पहिल्या सुरुवातीपासून विद्यार्थ्यांनी अभ्यासाला लागावे. शाळेमध्ये ज्या धड्याचे अध्ययन झालेले असेल त्याची घरी आल्यावर उजळणी करावी. त्या आधी पूर्ण धडा वाचावा म्हणजे आपण त्या धड्यात काय शिकणार आहोत याची कल्पना येते. त्यासाठी प्रथम विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करावे लागेल. त्याप्रमाणे रोज अभ्यास करावा म्हणजे अभ्यास करण्याची सवय लागते. तसेच विद्यार्थ्यांनी विषयांचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात ताणतणाव वाढत नाही. परीक्षेच्या वेळी अधिक उत्साहाने जातात.

आपण एक विद्यार्थी आहोत याची जाणीव त्यांना असायला हवी. शाळेची वेळ, घरातील इतर कामे आणि मोकळा वेळ गृहीत धरून विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन करावे लागेल. म्हणजे विषयांचे वेळापत्रक तयार करून दर दिवशी दिलेल्या वेळेनुसार अभ्यास करावा लागेल. या पद्धतीमुळे अभ्यासात सातत्य राहील. अभ्यास नियमितपणे केला जाईल. असे जरी असले तरी अवांतर वाचनसुद्धा अतिशय महत्त्वाचे असते. शाळेमध्ये शिक्षक अध्यापन करीत असताना लक्षपूर्वक ऐकावे. त्यातल्या काही आवश्यक मुद्द्यांचे टिपण करावे. काही शंका असल्यास बिनधास्तपणे अध्यापकांना विचाराव्यात. चुकीचे समजून घेऊ नये. यात आपलेच नुकसान आहे. म्हणजे अध्यापक वर्गात अध्ययन करीत असताना विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे. बऱ्याच वेळा धड्याखाली जे प्रश्न विचारलेले असतात तेच प्रश्न परीक्षेच्या वेळी विचारले जातात. तेव्हा त्या प्रश्नांची जी अचूक उत्तरे असतील त्याची नियमित उजळणी करणे गरजेचे असते. तसेच जे प्रश्न दिलेले असतील त्या उत्तरांची सुद्धा उजळणी व्हायला हवी. दुर्लक्ष केल्यास परीक्षेच्या वेळी जर तो प्रश्न विचारला गेल्यास अचूक उत्तर आपण लिहू शकत नाही. तेव्हा विषयाचे अध्ययन जरी झाले तरी प्रश्नांच्या उत्तरांची वेळच्यावेळी उजळणी करावी लागेल. म्हणजे परीक्षेला उत्तरे लिहिताना अडथळा येणार नाही. अधिक आत्मविश्वासाने परीक्षेची उत्तरपत्रिका सोडवू शकतो. हे सर्व नियमित अभ्यास आणि उजळणी केल्यामुळेच शक्य होऊ शकते.

विशेष म्हणजे प्रत्येक दिवशी सर्व विषयांची उजळणी करणे शक्य नसते. अशावेळी आपल्याला जो धडा कठीण वाटत असेल त्याचीच उजळणी करावी. म्हणजे पुढील धडा दुसऱ्या दिवशी घेता येतो. यासाठी आपले योग्य धेय्य असले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेशी झोप आणि सकस आहार दैनंदिन आहारात दिला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे लक्ष केंद्रित होते. अन्यथा मन विचलित होऊ शकते. हा निसर्गाचा नियम आहे. याची काळजी सर्व पालकांनी घेतली पाहिजे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतंत्र जागा पाहिजे. खेळती हवा, शांत वातावरण आणि पुरेसा प्रकाश असावा. अभ्यास करताना मध्येच थोडी विश्रांती घ्यावी. अभ्यासामध्ये काही शंका असल्यास शिक्षकांना विचारून वेळच्या वेळी शंकांचे निरसन करावे. हल्लीची मुले व्यसनाच्या आहारी गेलेली पाहायला मिळतात. हे टाळण्यासाठी योग्य वयात मुलांना व्यसनापासून सतर्क करणे गरजेचे आहे. संदेश देणे बंधनकारक आहे. तसेच सध्या टीव्ही बाजूला होऊन मोबाईलचा अतिरिक्त वापर होत आहे. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. तेव्हा योग्य कामासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करावा. अन्यथा मोबाईलला चार हात दूर ठेवावे. प्रत्येकाच्या जीवनात कधी यश, कधी अपयश आहे. मात्र अपयशाने खचून न जाता त्यावर मात करून पुढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी सुद्धा असेच करायला हवे. अपयशाने खचून न जाता आपला दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा. यश आपलेच असते. यातूनच विद्यार्थी यशस्वी होत असतात.



# कृषी : महाराष्ट्राच्या समृद्धीचा पाया : डॉ. राजेंद्र बगाटे

**दरवर्षी १ जुलै हा दिवस महाराष्ट्रात 'कृषी दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका स्मृतिदिनापुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीचा, शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांचा आणि शेतीच्या सर्वांगीण विकासाचा गौरव करणारा दिवस आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. महाराष्ट्राच्या कृषी विकासात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे शेतीच्या आधुनिकीकरणाला चालना मिळाली, सिंचनाचा विस्तार झाला, कृषी संशोधनाला प्रोत्साहन मिळाले आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण धोरणे राबविण्यात आली. त्यामुळे कृषी दिन हा केवळ एका नेत्याला अभिवादन करण्याचा दिवस नसून शेती आणि शेतकरी यांच्या सन्मानाचा, त्यांच्या योगदानाची जाणीव करून देणारा आणि कृषी क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी नव्या संकल्पांचा दिवस आहे.**



भारतीय संस्कृतीचा पाया कृषीवर उभा आहे. हजारो वर्षांपासून शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून जीवनपद्धती, संस्कृती आणि अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू राहिली आहे. महाराष्ट्राची ओळखही समृद्ध कृषी परंपरेमुळे निर्माण झाली आहे. विदर्भातील कापूस, मराठवाड्यातील ज्वारी, पश्चिम महाराष्ट्रातील ऊस, कोकणातील आंबा, नाशिकचा द्राक्षबागायती पट्टा, उत्तर महाराष्ट्रातील कांदा, खानदेशातील केळी, सातारा-सांगलीतील हळद आणि विविध भागांतील डाळी, तेलबिया, फळे व भाजीपाला यामुळे महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. राज्यातील भौगोलिक विविधता आणि हवामानातील बदलांमुळे विविध प्रकारची पिके घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात वैविध्य निर्माण झाले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया शेतीने घातला आहे.

शेतकरी हा समाजाचा अन्नदाता आहे. तो उन्हाची तमा न बाळगता, पावसाची अनिश्चितता सहन करत, अनेक संकटांना सामोरे जात शेती करतो. त्याच्या कष्टामुळे प्रत्येक घरात अन्न पोहोचते. शेती हा केवळ व्यवसाय नसून निसर्गाशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद आहे. बी पेरण्यापासून ते पीक घरात आणेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला संयम, परिश्रम आणि आशावादाची गरज असते. पाऊस वेळेवर पडेल का, रोगराई येईल का, बाजारभाव मिळेल का, उत्पादन खर्च भरून निघेल का, अशा अनेक प्रश्नांशी तो सतत झुंज देत असतो. तरीही तो निराश न होता पुन्हा नव्या हंगामाची तयारी करतो. म्हणूनच कृषी दिन हा शेतकऱ्यांच्या त्यागाचा आणि जिद्दीचा सन्मान करणारा दिवस आहे.

महाराष्ट्राच्या कृषी विकासामध्ये काळानुरूप मोठे बदल झाले आहेत. पारंपरिक शेतीपासून आधुनिक शेतीकडे वाटचाल करताना नवीन बियाणे, सुधारित अवजारे, ठिबक आणि तुषार सिंचन, यांत्रिकीकरण, कृषी संशोधन, हवामान आधारित सल्ला आणि माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. आज अनेक शेतकरी मोबाईलच्या माध्यमातून हवामानाचा अंदाज, बाजारभाव, पीक संरक्षण आणि कृषीविषयक मार्गदर्शन मिळवत आहेत. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि कृषी विज्ञान केंद्रे शेतकऱ्यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. उत्पादनवाढीसोबत गुणवत्तापूर्ण उत्पादनावर भर दिला जात असून निर्यातक्षम शेतीचा विस्तारही होत आहे.

हवामान बदल हे आज कृषी क्षेत्रासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. पावसाचे अनियमित स्वरूप, वाढते तापमान, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि पूर यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. एका बाजूला पाण्याचा तुटवडा तर दुसऱ्या बाजूला अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान अशी दुहेरी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शाश्वत कृषी विकासासाठी हवामानाशी सुसंगत शेती पद्धती स्वीकारणे अत्यावश्यक झाले आहे. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पावसाच्या पाण्याचे संधारण, पीक विविधीकरण, मृदसंवर्धन आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचा अवलंब या उपाययोजना भविष्यातील शेतीसाठी अत्यंत आवश्यक ठरणार आहेत.

पाणी हे शेतीचे प्राण आहे. महाराष्ट्रातील अनेक भाग अजूनही पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून जलव्यवस्थापनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवार, शेततळे, बंधारे, नाला खोलीकरण, ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यांसारख्या उपायांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर शक्य झाला आहे. अनेक गावांनी लोकसहभागातून जलसंधारणाची यशस्वी उदाहरणे निर्माण केली आहेत. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास उत्पादन वाढते, खर्च कमी होतो आणि दुष्काळाच्या संकटावर मात करता येते.

मातीचे आरोग्य जपणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. रासायनिक खतांचा अतिरेक, जमिनीची धूप आणि सेंद्रिय पदार्थांचे कमी होत जाणारे प्रमाण यामुळे जमिनीची सुपीकता घटत आहे. त्यामुळे सेंद्रिय खतांचा वापर, हिरवळीची खते, गांडूळखत, जैवखते आणि संतुलित पोषण व्यवस्थापन यावर भर देणे गरजेचे आहे. मृदा परीक्षण करून आवश्यकतेनुसार खतांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होण्याबरोबरच खर्चातही बचत होते. माती ही केवळ उत्पादनाचे साधन नसून पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवण्याची नैसर्गिक संपत्ती आहे.

आजच्या काळात नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती आणि शाश्वत शेती यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्राहकांमध्ये रसायनमुक्त अन्नधान्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी नैसर्गिक शेतीकडे वळत आहेत. स्थानिक संसाधनांचा वापर, कमी खर्च, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि जमिनीचे आरोग्य जपण्यावर आधारित शेती भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरत आहे. अशा शेतीमुळे उत्पादनाचा दर्जा सुधारतो, पर्यावरणाचे संवर्धन होते आणि ग्राहकांनाही सुरक्षित अन्न उपलब्ध होते.

कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाने मोठी क्रांती घडवून आणली आहे. ड्रोनद्वारे पीक निरीक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित रोगनिदान, उपग्रह तंत्रज्ञान, सेन्सर प्रणाली, स्वयंचलित सिंचन, डिजिटल बाजारपेठ आणि ई-व्यापारामुळे शेती अधिक वैज्ञानिक बनत आहे. अचूक शेतीमुळे पाणी, खते आणि कीटकनाशकांचा योग्य वापर करता येतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढते. भविष्यात डिजिटल कृषी ही ग्रामीण विकासाची महत्त्वाची दिशा ठरणार आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केवळ उत्पादन वाढविणे पुरेसे नाही, तर मूल्यवर्धन आणि बाजारपेठेशी थेट जोडणी आवश्यक आहे. कृषी प्रक्रिया उद्योग, शीतगृहे, साठवणूक सुविधा, निर्यात, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि थेट ग्राहकांना विक्री या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळू शकतो. फळे, भाजीपाला, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग आणि कृषी पर्यटन यांसारखे पूरक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यास मदत करतात. शेतीला उद्योगाची जोड मिळाल्यास रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढ दोन्ही शक्य होतात.

महिलांचे कृषी क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, बीज संवर्धन आणि कृषी प्रक्रिया यामध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. अनेक महिला बचतगट कृषीपूरक उद्योग यशस्वीपणे चालवत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य, बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढविणे आवश्यक आहे. महिला सशक्त झाल्यास कृषी विकासालाही नवी गती मिळते.

युवा पिढीने शेतीकडे आधुनिक व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज आहे. कृषी पदवीधर, कृषी उद्योजक आणि स्टार्टअपच्या माध्यमातून अनेक तरुण शेतीत नवकल्पना आणत आहेत. स्मार्ट शेती, कृषी सल्लागार सेवा, अॅग्री-टेक, जैवउत्पादने, प्रक्रिया उद्योग आणि ई-कॉमर्सच्या माध्यमातून शेतीला नवे आयाम मिळत आहेत. शिक्षित तरुणांनी ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करून कृषी क्षेत्र अधिक स्पर्धात्मक आणि सक्षम बनविण्याची आवश्यकता आहे.

कृषी शिक्षण आणि संशोधन हे कृषी विकासाचे आधारस्तंभ आहेत. बदलत्या हवामानानुसार नवीन वाण विकसित करणे, रोगप्रतिबंधक तंत्रज्ञान, कमी खर्चातील शेती, जैवविविधतेचे संवर्धन आणि आधुनिक कृषी व्यवस्थापन यासाठी संशोधन संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. संशोधनातून विकसित होणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचले तर कृषी क्षेत्र अधिक सक्षम होईल.

आज कृषी क्षेत्रासमोर अनेक समस्या आहेत. उत्पादन खर्च वाढत आहे, बाजारभावात चढ-उतार होत आहेत, नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे, शेतीचे क्षेत्र लहान होत आहे आणि ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी दीर्घकालीन कृषी धोरण, शाश्वत जलव्यवस्थापन, पिकांचे योग्य नियोजन, विमा संरक्षण, कृषी प्रक्रिया उद्योग आणि शेतकरी-केंद्रित धोरणे आवश्यक आहेत. शासन, संशोधन संस्था, स्वयंसेवी संघटना आणि शेतकरी यांनी समन्वयाने कार्य केल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम होऊ शकते.

'जय जवान, जय किसान' हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. देशाची अन्नसुरक्षा, अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच अवलंबून आहे. कृषी हा केवळ अर्थकारणाचा विषय नसून पर्यावरण, संस्कृती, रोजगार, पोषण आणि ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाचा योग्य सन्मान, त्यांच्या उत्पादनाला न्याय्य मोबदला आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास भारत जगातील अग्रगण्य कृषी राष्ट्र म्हणून अधिक सक्षमपणे उभा राहू शकतो.

कृषी दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा आणि नव्या संकल्पांचा दिवस आहे. शेतकरी समृद्ध झाला तर गाव समृद्ध होईल, गाव समृद्ध झाले तर राज्य प्रगत होईल आणि राज्य प्रगत झाले तर देशाची प्रगती अधिक वेगाने होईल. म्हणूनच कृषी दिनाच्या निमित्ताने जल, जमीन, जंगल आणि जैवविविधतेचे संवर्धन करत आधुनिक विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांचा समन्वय साधणारी शाश्वत शेती उभारण्याचा निर्धार करणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाचा सन्मान, कृषी क्षेत्रातील नवसंशोधनाचा स्वीकार आणि निसर्गाशी सुसंगत विकासाचा मार्ग स्वीकारणे, हीच महाराष्ट्राच्या कृषी दिनाची खरी प्रेरणा ठरेल. कृषी हा केवळ व्यवसाय नाही, तर संस्कृती, सभ्यता आणि जीवनाचा आधार आहे. त्यामुळे "समृद्ध शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र आणि समृद्ध भारत" हे स्वप्न साकार करण्यासाठी कृषी दिन हा प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणा, कृतज्ञता आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

**■ डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## लोकमानस

### मुलखांवेगळी माणस
### २ लाख पुस्तकांचा अनोखा संग्रह

कर्नाटकचे अंके गौडा यांना वाचण्याचा छंद जडल्याने या अवलिया माणसाने हजार, दोन हजार नव्हे, तर तब्बल वीस लाख पुस्तके जमवली आहेत आणि आज 'पुस्तका मने' (पुस्तकांचे घर) नावाने त्यांनी स्वतःचे ग्रंथालय उभे केले आहे. आपल्या देशात स्वतःच्या संग्रहामध्ये सर्वाधिक पुस्तके असण्याचा मान त्यांना जातो. अलीकडेच त्यांचा पद्मश्री पुरस्कार देऊन भारत सरकारने गौरव केला. कर्नाटकाच्या मंड्या जिल्ह्यामधील पांडवपुरा तालुक्यात चिनाकुर्ली गावात १९४७ मध्ये अंकेगौडा यांचा जन्म झाला. चौथीला असतानाच गुरुवर्यांचा त्यांना हा जीवन मार्ग दाखवणारा उपदेश दीपस्तंभासारखा मदतीला धावून आला. त्यानुसार चौथीला असतानाच स्वामी विवेकानंद यांच्यासंबंधित पुस्तक वाचायला घेतले आणि तेव्हापासून जो पुस्तक वाचण्याचा छंद जडला तो आज अखेर सात दशके कायमचा चालू आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील कमाई पुस्तक खरेदी करण्यासाठीच वापरली. एका बाजूला वाचण्याचा छंद चालूच होता. त्यांना दोन मोठ्या बहिणी होत्या. आई-वडील काही खाऊ घेण्यासाठी पैसे द्यायचे त्या पैशातून अंके गौडा पुस्तके खरेदी करून वाचन करायचे. बहिणींना मिळणाऱ्या पैशातूनही ते पुस्तके खरेदी करायचे. अशा पद्धतीने त्यांनी वाचनाचा छंद लावून घेतला. त्याच्यामध्ये कन्नड साहित्य, धार्मिक साहित्य, सांस्कृतिक साहित्य आणि इतिहास यांचा सुरुवातीच्या काळामध्ये समावेश होता.टाईम कीपरची नोकरीपदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना पांडवपुरा सहकारी साखर कारखान्यामध्ये टाईम कीपरची नोकरी मिळाली. ही नोकरी त्यांनी ३३ वर्षे केली. या नोकरीतून मिळणाऱ्या पगाराची बहुतांश रक्कम पुस्तके खरेदी करण्यासाठीच खर्च केली. असे करीत करीत त्यांच्याकडे २०१६ पर्यंत लाखो पुस्तके जमा झाली होती. आयुष्याची सारी कमाई पुस्तक खरेदी करण्यामध्ये घालविलेली असल्यामुळे त्यांना आता सुमारे वीस लाख पुस्तकांची व्यवस्था करण्यास मोठे ग्रंथालय करणे शक्यच नव्हते. पांडवपुराचे सुपुत्र असलेले कर्नाटकातील नामांकित उद्योजक हरी खोडे झाली त्यांचा अंके गौडा यांच्याशी संपर्क आला. पुस्तके जमवण्याची आणि ती वाचण्याची तसेच नव्या पिढीला ती मोफत उपलब्ध करून देण्याची अंके गौडा यांची तळमळ पाहून हरी खोडे यांनी सुमारे सोळा हजार चौरस फूट ग्रंथालय उभे केले..विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक, संशोधक शिवाय सामान्य नागरिक या ग्रंथालयाचा उपयोग करून घेतात. तिथे कोणत्याही प्रकारचे पैसे घेतले जात नाहीत. असा हा एक अवलिया. यांच्या कामाकडे लिमका बुक्स ऑफ रेकॉर्डचे २०१६ मध्ये लक्ष गेले. वैयक्तिक पातळीवर पुस्तकांचा संग्रह करून ठेवण्याचा हा भारतातील सर्वात मोठा उपक्रम म्हणून अंके गौडा यांची नोंद झाली.




### फिडेलिटीची लोधावर गुंतवणूक: जागतिक गुंतवणूकदाराची ₹1,864 कोटींची गुंतवणूक

फिडेलिटी इन्व्हेस्टमेंट्सने लोधा डेव्हलपर्समध्ये सुमारे 2% हिस्सा अंदाजे ₹1,864 कोटी (US$200 दशलक्ष) मध्ये विकत घेतल्याने, लोधा तसेच भारताच्या निवासी रिअल इस्टेट बाजाराच्या दीर्घकालीन क्षमतेवरील महत्त्वपूर्ण विश्वास अधोरेखित झाला आहे. दीर्घकालीन आणि संशोधनाधारित गुंतवणूक दृष्टिकोनासाठी जागतिक स्तरावर ओळखल्या जाणाऱ्या फिडेलिटीने लोधामध्ये केलेली ही मोठी गुंतवणूक कंपनीचे बाजारातील नेतृत्व, वाढीचा प्रवास आणि दीर्घकालीन भागधारक मूल्य निर्माण करण्याच्या क्षमतेवरील विश्वास दर्शवते.फिडेलिटी, जी जागतिक स्तरावर US$5 ट्रिलियनहून अधिक मालमत्ता व्यवस्थापित करते, ही जगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थात्मक गुंतवणूकदारांपैकी एक मानली जाते. विशेष म्हणजे, ही गुंतवणूक अशा वेळी झाली आहे जेव्हा परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर निव्वळ विक्रेते राहिले आहेत. अशा पार्श्वभूमीवर, फिडेलिटीने लोधामध्ये महत्त्वपूर्ण हिस्सा उभारण्याचा निर्णय घेतला, जो कंपनी तसेच भारताच्या गृहनिर्माण क्षेत्रावरील ठाम विश्वासाचे प्रतीक आहे.लोधासाठी ही गुंतवणूक भारतातील अग्रगण्य निवासी रिअल इस्टेट विकासक म्हणून त्यांची स्थिती अधिक मजबूत करते. सूचीबद्ध झाल्यापासून कंपनीने आर्थिक तसेच कार्यात्मक पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.आर्थिक वर्ष २६ मध्ये लोधाने ₹205.3 अब्ज इतकी विक्रमी प्री-सेल्स नोंदवली,

### अक्षरधारा : हॉरीझॉन उपक्रमातून विद्यार्थी गिरवणार कृत्रिम बुद्धिमत्तेचे धडे

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) ज्या वेगाने उद्योग, नोकऱ्या आणि भविष्यातील करिअरसाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांमध्ये बदल घडवून आणत आहे, ते लक्षात घेऊन SVKM च्या नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ने 'NMIMS हॉरिझॉन ची घोषणा केली आहे. ही विद्यापीठ स्तरावरील एक 'फ्यूचर स्किल्स' (भविष्यातील कौशल्ये) उपक्रम असून, विद्यार्थ्यांमधे AI-आधारित अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक क्षमता निर्माण करण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली आहे.'कोर्सेरा' च्या सहकार्याने विकसित केलेल्या या उपक्रमाद्वारे, NMIMS कॅम्पसमधील सुमारे ४०,००० विद्यार्थ्यांना AI-सक्षम लर्निंग पाथवेज (अभ्यासक्रम), जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे आणि उद्योग-संबंधित कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होतील, ज्या थेट त्यांच्या शैक्षणिक प्रवासात समाविष्ट केल्या जातील. उच्च शिक्षण संस्था AI साक्षरता आणि भविष्यातील कौशल्यांच्या वाढत्या मागणीला कशा प्रकारे प्रतिसाद देत आहेत, यामधील हा उपक्रम एक मोठा बदल दर्शवतो. आज नियोक्ते अशा पदवीधरांच्या शोधात आहेत जे उगवत्या तंत्रज्ञानासोबत काम करू शकतील; नेमकी हीच गरज ओळखून NMIMS ने आपल्या विविध कार्यक्रमांच्या अभ्यासक्रमात AI-सक्षम लर्निंगचा समावेश केला आहे. 'NMIMS हॉरिझॉन'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोर्सेरावरील विविध अभ्यासक्रमांचा लाभ घेता येईल, ज्यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, डेटा अॅनॅलिटिक्स, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन्स आणि इमर्जिंग टेक्नॉलॉजीज (उगवते तंत्रज्ञान) यांवर केंद्रित असलेल्या अभ्यासक्रमांच्या एका विशेष संचाचा समावेश आहे. हे लर्निंग पाथवेज विद्यार्थ्यांच्या मुख्य शैक्षणिक अभ्यासक्रमाला पूरक ठरतील आणि बदलत्या उद्योगांच्या गरजांनुसार व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यास मदत करतील अशा पद्धतीने तयार करण्यात आले आहेत.

■ कलन –संयोजन सुबोध रणशेवरे

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# पवन फुटके यांच्यावरील हल्ल्याचा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या बैठकीत तीव्र निषेध!



## माजी खासदार रामदास तडस यांच्या उपस्थितीत झाला ठराव; दोषींवर कारवाईसाठी मुख्यमंत्र्यांकडे करणार पाठपुरावा

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक नेते तथा तेली युवक संघटनेचे तालुकाध्यक्ष पवन फुटके यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या राज्यस्तरीय कार्यकारिणी बैठकीत तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथे रविवार, दि. २८ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय बैठकीत हा निषेध ठराव एकमुखाने मंजूर करण्यात आला. दोषींवर तातडीने कठोर कारवाई व्हावी यासाठी मुख्यमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे संघटनेच्या वतीने पाठपुरावा करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

काही दिवसांपूर्वी परळी येथील राष्ट्रवादीचे युवक नेते पवन फुटके यांना जुन्या वादातून एका हॉटेलवर बोलावून घेऊन त्यांच्यावर कत्तीने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या घटनेचे संपूर्ण महाराष्ट्रातील समाज बांधवांमध्ये तीव्र पडसाद उमटले आहेत. प्रमुख नेत्यांची उपस्थिती आणि निषेध ठराव छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीला महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार रामदासजी तडस, सरचिटणीस (महासचिव) प्राचार्य डॉ. भूषण कर्डिले, कार्याध्यक्ष गजानन नाना शेलार, सहसचिव सुनील चौधरी यांच्यासह महाराष्ट्राच्या



कानाकोपऱ्यातून आलेले राज्य कार्यकारिणी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत पवन फुटके यांच्यावरील हल्ल्याचा निषेध करण्याचा मुख्य ठराव संघटनेचे महासचिव प्राचार्य डॉ. भूषण कर्डिले यांनी मांडला. उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी हात उंचावून या ठरावाला जाहीर मान्यता दिली.

**■ मुख्यमंत्र्यांकडे करणार पाठपुरावा**

पवन फुटके यांच्यावर हल्ला करणाऱ्या मुख्य सूत्रधारांसह सर्व दोषींवर पोलिसांनी लवकरात लवकर कायदेशीर व कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या संवेदनशील प्रकरणात कोणतीही दिरंगाई होऊ नये म्हणून संघटनेचे शिष्टमंडळ थेट मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेणार असून, त्यांच्याकडे या संपूर्ण प्रकरणाचा तातडीने पाठपुरावा करण्याचा महत्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला.



# गेवराई पोलिसांची धडक कारवाई महसूल विभागाने जप्त केलेला ट्रॅक्टर चोरी करणारी टोळी २४ तासांत गजाआड!

**गेवराई (बीड)**

महसूल विभागाने अवैध वाळू वाहतूक करताना जप्त करून गेवराई बस आगारात लावून ठेवलेला ट्रॅक्टर चोरणाऱ्या आरोपींना २४ तासांच्या आत मुद्देमालासह अटक करण्यात गेवराई पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे परिसरात त्यांचे कौतुक होत आहे.

**■ महसूल पथकाची कारवाई अन् धाडसी चोरी**

मिळालेल्या माहितीनुसार, हिंगणगाव शिवारात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्या एका 'स्वराज' कंपनीच्या ट्रॅक्टर-ट्रॉली आणि अशोक लेलँड छोटा हत्ती या वाहनांवर महसूल पथकाने कारवाई केली होती. ही वाहने जप्त करून गेवराई येथील बस आगारात सुरक्षिततेसाठी रजिस्ट्रारला नोंद करून लावून ठेवण्यात आली होती.

परंतु, दिनांक २८ जून २०२६ रोजी रात्री २:१५ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरांनी या बस आगारातून चक्क जप्त केलेला 'स्वराज' ट्रॅक्टर ट्रॉलीसह चोरून नेला. याप्रकरणी हिंगणगाव सज्जाचे तलाठी चंद्रकांत बाबुराव बतुलवार (वय २५) यांनी २९ जून २०२६ रोजी गेवराई पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली. त्यानुसार पोलीस ठाण्यात गुरनं. ३८८/२०२६, कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता (BNS)-२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## पोलिसांनी २४ तासांत आवळल्या आवळल्या आवळल्या मुसक्या -

**गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून गेवराई पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. विशेष पोलीस पथक तयार करून आरोपींचा माग काढण्यात आला. फिर्याद प्राप्त होताच अवघ्या २४ तासांच्या आत पोलिसांनी चोरीला गेलेला स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली हस्तगत केली, तसेच संबंधित आरोपींना बेड्या ठोकल्या. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार कल्याण राठोड करत आहेत.**

**ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक मा. नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक मा. समीर शेख, आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके व पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत गेवराई पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अतुलकुमार लांडगे, सपोनि समाधान दौड, पोलीस कर्मचारी अशोक हंबरडे, कल्याण राठोड, गोरक्ष डोके, धिरज खांडेकर, विनोद कुटे, नारायण सदवदे आणि राजेंद्र चोरमले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.**

# विजया मेहता 'बाई' : एका सांस्कृतिक युगाचा अस्त


३० जून २०२६ रोजी वयाच्या ९१व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने केवळ एक ज्येष्ठ कलावंत हरपलेला नाही, तर भारतीय रंगभूमीच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिग्दर्शकाची दूरदृष्टी, अभिनेत्रीची भावसमृद्धी, लेखिकेची प्रगल्भता, गुरूची माया, संशोधकाची चिकित्सक वृत्ती आणि संस्कृतीरक्षकाची जबाबदारी यांचा अद्वितीय संगम होता.

४ नोव्हेंबर १९३४ रोजी जन्मलेल्या विजया मेहता यांचे पूर्वाश्रमीचे नाव विजया जयवंत होते. बालपणापासूनच कला, साहित्य आणि संस्कृतीचे संस्कार लाभलेल्या या प्रतिभावंत व्यक्तिमत्त्वाने पुढे भारतीय रंगभूमीचे स्वरूपच बदलून टाकले. त्यांचा पहिला विवाह अभिनेत्री दुर्गा खोटे यांचे सुपुत्र हरीन खोटे यांच्याशी झाला. परंतु अल्पावधीतच हरीन खोटे यांचे निधन झाले. दोन लहान मुलांचा सांभाळ करीत त्यांनी जीवनाशी पुन्हा नव्याने सामना केला. त्यानंतर त्यांनी फारुख मेहता यांच्याशी विवाह केला. वैयक्तिक जीवनातील दुःख, संघर्ष आणि जबाबदाऱ्या यांवर मात करत त्यांनी कलासाधनेचा प्रवास कधीही खंडित होऊ दिला नाही. म्हणूनच त्यांच्या जीवनाचा प्रत्येक टप्पा हा धैर्य, आत्मविश्वास आणि जिद्दीचा प्रेरणादायी दस्तऐवज ठरतो.

१९६० च्या दशकात मराठी रंगभूमी संक्रमणाच्या अवस्थेत होती. व्यापारी रंगभूमीचा प्रभाव वाढत असताना नाटकाच्या आशय, अभिव्यक्ती आणि कलात्मकतेला नवे आयाम देण्याची आवश्यकता जाणवत होती. अशा काळात विजय तेंडुलकर, अरविंद देशपांडे, डॉ. श्रीराम लागू आणि समविचारी सहकाऱ्यांसह विजया मेहता यांनी 'रंगायन' या ऐतिहासिक संस्थेची स्थापना केली. ही संस्था केवळ नाट्यसंस्था नव्हती; ती आधुनिक मराठी प्रायोगिक रंगभूमीची चळवळ होती. 'रंगायन'ने मराठी नाटकाला आशयगर्भता, प्रयोगशीलता, बौद्धिक प्रगल्भता आणि जागतिक नाट्यदृष्टी दिली. भारतीय रंगभूमीतील आधुनिकतेचा पाया रचणाऱ्या या चळवळीच्या त्या प्रमुख अध्वर्यू ठरल्या.

विजया मेहता यांच्या दिग्दर्शनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आशय आणि मांडणीचे अर्थगर्भ प्रयोग. त्यांच्यासाठी नाटक हे केवळ कथा सांगण्याचे माध्यम नव्हते; तर मानवी मनाचा, समाजाचा आणि संस्कृतीचा शोध घेणारी सर्जनशील प्रक्रिया होती. मितव्ययी नेपथ्य, अर्थपूर्ण प्रकाशयोजना, देहबोलीतील सूक्ष्मता, शांततेचा परिणामकारक वापर आणि संवादातील अंतःसंगीत

**"रंगभूमी ही केवळ करमणुकीचे माध्यम नसते; ती समाजाच्या संवेदना घडवणारी, विचारांना दिशा देणारी आणि मानवी अस्तित्वाचे सूक्ष्म अर्थ उलगडणारी एक सर्जनशील प्रयोगशाळा असते." या विचाराला आपल्या अखंड कलासाधनेतून मूर्त रूप देणाऱ्या ज्येष्ठ दिग्दर्शिका, चतुरस्त्र अभिनेत्री, प्रगल्भ लेखिका, आधुनिक मराठी रंगभूमीच्या प्रमुख प्रवर्तक आणि भारतीय नाट्यविश्वातील सर्वोच्च मानदंड ठरलेल्या विजया मेहता यांच्या निधनाने भारतीय सांस्कृतिक विश्वातील एका युगाचा अस्त झाला आहे. मराठी रंगभूमीवर प्रेमाने आणि आदराने ज्यांना संपूर्ण नाट्यविश्व "बाई" म्हणून संबोधत होते, त्या विजया मेहता या केवळ एक व्यक्ती नव्हत्या; त्या एक संस्था होत्या, एक विचार होत्या, एक सांस्कृतिक परंपरा होत्या आणि सर्जनशीलतेचे सजीव विद्यापीठ होत्या.**




यांच्या साहाय्याने त्यांनी रंगमंचाला चिंतनाची जागा बनवले. त्यांच्या प्रत्येक नाट्यप्रयोगात प्रेक्षक केवळ कथा पाहत नसत; ते स्वतःच्या आयुष्याशी संवाद साधत असत.

त्यांच्या दिग्दर्शनात पात्रांच्या अंतर्मनाचा शोध हा केंद्रस्थानी असे. अभिनय म्हणजे संवाद पाठांतर नव्हे; तर पात्राचे संपूर्ण अस्तित्व स्वतःमध्ये जगणे, अशी त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या तालमीतून घडलेले कलाकार पुढे भारतीय रंगभूमीवरील मानदंड ठरले. त्यांनी कलाकारांना अभिनयाची तंत्रे शिकवली नाहीत; त्यांनी संवेदनशीलतेची शिस्त, विचारांची खोली आणि कलात्मक प्रामाणिकता शिकवली.

अभिनेत्री म्हणूनही त्यांचे स्थान तितकेच उंच आहे. त्यांच्या अभिनयात कृत्रिमतेचा लवलेश नव्हता. चेहऱ्यावरील सूक्ष्म भाव, आवाजातील लय, शांततेतील अर्थपूर्णता आणि संवादातील भावविश्व ही त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्ये होती. त्यांनी साकारलेल्या स्त्री व्यक्तिरेखा भावनिकतेच्या चौकटीत अडकलेल्या नव्हत्या; त्या आत्मभान असलेल्या, संघर्षशील, स्वाभिमानी आणि विचारशील होत्या. त्यामुळे त्यांच्या भूमिका काळाच्या पुढे जाणाऱ्या ठरल्या.

त्यांच्या कलासाधनेचा विस्तार रंगभूमीपुरता मर्यादित राहिला नाही. चित्रपट आणि दूरचित्रवाणी या माध्यमांतही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. 'पार्टी' या चित्रपटातील त्यांची भूमिका विशेष गाजली. त्यांनी दिग्दर्शित केलेले 'पेस्तनजी' आणि 'रावसाहेब' हे चित्रपट भारतीय समांतर चित्रपटसृष्टीतील महत्त्वाचे टप्पे मानले जातात. याशिवाय 'कलियुग', 'क्वेस्ट', 'रायडिंग द बस विथ माय सिस्टर', 'हवेली बुलंद थी', 'लाईफलाईन', 'शाकुंतलम', 'स्मृतिचित्रे' यांसारख्या चित्रपट व दूरचित्रवाणी माध्यमांतील त्यांच्या कार्याने त्यांच्या कलाविश्वाचा व्यापक आवाका अधोरेखित केला.

रंगभूमीवरील त्यांच्या अविस्मरणीय कलाकृतींमध्ये अजब न्याय वर्तुळाचा, एक शून्य बाजीराव, एका घरात होती, जास्वंदी, पुरुष, बॅरिस्टर, मला उत्तर हवंय, मादी, वाडा चिरेबंदी, श्रीमंत, हयवदन, हमिदाबाईची कोठी यांसारख्या नाटकांचा समावेश होतो. या प्रत्येक नाटकातून त्यांनी मानवी नातेसंबंध, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीचे अस्तित्व, बदलती मूल्यव्यवस्था, मानसिक संघर्ष आणि सामाजिक वास्तव यांचा अत्यंत संवेदनशील वेध घेतला. त्यांनी व्यापारी आणि प्रायोगिक रंगभूमी यांच्यातील कृत्रिम भिंती मोडून दोन्ही प्रवाहांना समृद्ध करणारी सौंदर्यदृष्टी दिली.

विजया मेहता या तितक्याच प्रगल्भ लेखिकाही होत्या. त्यांचे 'झिम्मा' हे आत्मचरित्र मराठी साहित्यविश्वातील मैलाचा दगड मानले जाते. हा ग्रंथ केवळ एका कलाकाराचे आत्मकथन नाही; तर आधुनिक मराठी रंगभूमीचा सांस्कृतिक इतिहास आहे. 'झिम्मा : गोफ आठवणींचा' या आत्मकथनातून त्यांनी कला, संस्कृती, नाती, संघर्ष, सर्जनशीलता आणि मानवी अनुभवांचा विलक्षण पट उलगडला आहे. हा ग्रंथ स्मरणरंजनापलीकडे जाऊन एका संपूर्ण सांस्कृतिक पिढीच्या सामूहिक स्मृतींचा दस्तऐवज बनतो. म्हणूनच तो मराठी वाङ्मयातील चिरंतन असा अमूल्य ठेवा मानला जातो.

त्यांच्या नाट्यकारकिर्दीवर 'बाई – एका रंगपर्वाचा मनोहर प्रवास' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित झाला आहे. तसेच प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे लिखित 'दिग्दर्शक : कॅप्टन ऑफ दी थिएटर' या संदर्भग्रंथात विजया मेहता यांच्या रंगदिग्दर्शनातील सर्जनशीलता, रंगदृष्टी, नाट्यतत्त्वज्ञान आणि आधुनिक भारतीय रंगभूमीवरील त्यांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

स्त्री नेतृत्वाचा नवा आदर्श निर्माण करण्यातही विजया मेहता यांचे योगदान अतुलनीय आहे. ज्या काळात रंगदिग्दर्शन हे पुरुषप्रधान क्षेत्र मानले जात होते, त्या काळात त्यांनी कोणतीही घोषणाबाजी न करता आपल्या प्रतिभा, अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तेच्या बळावर सर्वोच्च स्थान प्राप्त केले. त्यांनी सिद्ध केले की नेतृत्व हे लिंगावर नव्हे; तर दृष्टिकोन, परिश्रम, सर्जनशीलता आणि मूल्यनिष्ठेवर उभे असते.

भारतीय रंगभूमीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून देण्यातही त्यांचे योगदान अमूल्य आहे. देश-विदेशात सादर झालेल्या त्यांच्या नाट्यप्रयोगांनी भारतीय रंगपरंपरेचा आशय, सौंदर्य आणि आधुनिकतेचा संगम जगासमोर प्रभावीपणे मांडला. भारतीय रंगसंस्कृतीच्या सांस्कृतिक राजदूताची भूमिका त्यांनी अत्यंत समर्थपणे पार पाडली.

त्यांच्या असामान्य योगदानाची दखल घेत त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मानांनी गौरविण्यात आले. पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, कालिदास सन्मान, विष्णूदास भावे सुवर्णपदक, नाट्यदर्पण पुरस्कार, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाची मानद डी.लिट्., महाराष्ट्र शासनाचा नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्कार, चतुरंग प्रतिष्ठान जीवनगौरव पुरस्कार (२०१२), रत्नागिरी आर्ट सर्कल–आशय सांस्कृतिक पुलोत्सव सन्मान, रूपवेध प्रतिष्ठानचा तन्वीर सन्मान, तसेच त्यांच्या 'झिम्मा' या आत्मचरित्राला भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचा लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार अशा अनेक गौरवांनी त्यांचे कार्य सन्मानित झाले.

मराठी रंगभूमीवर "बाई" हा शब्द उच्चारला की डोळ्यांसमोर उभे राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे विजया मेहता. हा सन्मान त्यांच्या वयामुळे नव्हे; तर त्यांच्या ज्ञानामुळे, कलासाधनेमुळे, कलाकारांवरील मायेच्या सावलीमुळे आणि कलात्मक प्रामाणिकतेमुळे त्यांना प्राप्त झाला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कठोर शिस्त होती; पण त्याचवेळी विद्यार्थ्यांविषयी अपार माया, नव्या पिढीविषयी विश्वास आणि स्वतः सतत शिकत राहण्याची विलक्षण वृत्ती होती. त्यांच्या सहवासातून घडलेली कलाकारांची पिढी आजही त्यांच्या विचारांची साक्ष देत उभी आहे.

३० जून २०२६ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला; परंतु खरा कलाकार कधीच संपत नाही. तो आपल्या कलाकृतींमध्ये, विचारांमध्ये, शिष्यांमध्ये आणि समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीत कायम जिवंत राहतो. विजया मेहता यांच्या बाबतीत हे अक्षरशः सत्य आहे. त्यांनी चेतवलेली कलाज्योत, त्यांनी घडवलेली कलाकारांची पिढी, त्यांनी दिलेली नवी रंगभाषा, त्यांनी रुजवलेली प्रयोगशीलता आणि त्यांनी जपलेली सांस्कृतिक मूल्ये हीच त्यांची चिरंतन स्मारके आहेत.

रंगमंचावरील पडदा खाली आला आहे; पण त्यांनी प्रज्वलित केलेली सर्जनशीलतेची ज्योत कधीही विझणार नाही. मराठी आणि भारतीय रंगभूमीच्या इतिहासात विजया मेहता हे नाव केवळ एका दिग्दर्शिकेचे, अभिनेत्रीचे किंवा लेखिकेचे राहणार नाही; ते कलात्मक प्रामाणिकतेचे, प्रयोगशीलतेचे, वैचारिक स्वातंत्र्याचे, सांस्कृतिक नेतृत्वाचे आणि अखंड साधनेचे शाश्वत प्रतीक म्हणून युगानुयुगे स्मरणात राहील.

"नाटकाचा प्रयोग संपतो; पण त्यातून जन्मलेला विचार कधीच संपत नाही. विजया मेहता 'बाई' यांनी चेतविलेली विचारांची ज्योत भारतीय रंगभूमीला चिरंतन प्रकाश देत राहील."

**भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली!**

**- प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे,**
नाट्यशास्त्र विभाग, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी. (९८२२८३६६७५)

------

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
बीड, बुधवार 1 जुलै 2026
Last page

# इच्छाशक्तीच्या जोरावर ग्रामस्थांनी लोकसहभागातून साकारला वस्ती रस्ता!

## आमदार नमिताताई मुंदडा यांनी दिलेला शब्द पाळला नाही ग्रामपंचायत स्तरावरुन सहकार्य न मिळाल्याने ग्रामस्थांचा स्वखर्चातून रस्ता करण्याचा निर्णय

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनकरंजा येथील उपसा वस्ती ते पवारवाडी या वस्ती रस्त्याचे काम शासनाच्या निधीची वाट न पाहता आणि ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षाला कंटाळून अखेर ग्रामस्थांनी लोकसहभागातून पूर्ण केले आहे. सर्व वस्तीवरील नागरिकांनी एकजुटीने सुमारे दीड किलोमीटर लांबीचा रस्ता श्रमदानातून व स्वखर्चातून तयार केला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेऊन मार्गी लावल्याने, ग्रामपंचायतीचा नाकर्तेपणा समोर आला आहे. मात्र, नागरिकांनी स्वतःच्या हिमतीवर हा रस्ता तयार केल्याने परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

- **शाळकरी मुले, शेतकरी व रुग्णांचे होत होते हाल**


बनकरंजा गावांतर्गत उपसा वस्ती ते धनगरवाडा, चिंचाशेत वस्ती आणि पवारवाडी दरम्यानचा दीड किलोमीटरचा रस्ता अत्यंत खराब झाला होता. यामुळे ग्रामस्थांना, शाळकरी मुलांना आणि शेतकऱ्यांना ये-जा करताना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत होता. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे एखादी व्यक्ती आजारी पडल्यास वस्तीपर्यंत रुग्णवाहिका देखील पोहोचू शकत नव्हती. प्रशासनाकडे वारंवार मागण्या करूनही निधीअभावी हे काम रखडले होते. अखेर, लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत प्रशासनाच्या दिरंगाईला कंटाळून वस्तीवरील तरुणांनी व ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येत 'आपला रस्ता आपणच करणार' असा ठाम निर्धार केला.

- **निधी गोळा करून केले रस्त्याचे काम लोकप्रतिनिधींना जाब विचारणार!**

या कामासाठी वस्तीवरील नागरिकांनी विशेष बैठक घेऊन नियोजन केले. यामध्ये प्रत्येक कुटुंबाने आपल्या क्षमतेनुसार आर्थिक वाटा उचलला. ग्रामस्थांच्या या सामूहिक प्रयत्नांमुळे आणि अहोरात्र घेतलेल्या कष्टांमुळे अवघ्या काही दिवसांतच चिखलमय आणि खडकाळ असलेल्या या रस्त्याचे रूप पालटले असून, आता हा रस्ता वाहतुकीसाठी सुकर झाला आहे.

शासकीय निधीवर विसंबून न राहता स्वावलंबनाचा एक उत्तम आदर्श या वस्तीवरील नागरिकांनी घालून दिला आहे. दरम्यान, "निवडणुकीच्या काळात मत मागण्यासाठी येणाऱ्या लोकप्रतिनिधींना आता त्यांच्याच भाषेत जाब विचारणार," असा संतप्त सूर वस्तीवरील नागरिकांमधून उमटत आहे.




# क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एम. ए.प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी प्रा. वा. ना. आंधळे यांची कविता

**एरंडोल |** येथील सुप्रसिद्ध कवी प्रा. वा. ना. आंधळे यांची "आई, मला जन्म घेऊ दे" या कवितेचा समावेश कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या पदव्युत्तर एम. ए. मराठी (MAR 412) या क्रमांकाच्या 'साहित्य समीक्षा : सिद्धांत आणि उपयोजन' या अभ्यास पत्रिकेत करण्यात आला असून विद्यापीठाचे या संदर्भातील पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे.

या कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आस्वादक समीक्षा पद्धती अभ्यासता येईल.अभ्यास मंडळाच्या या उद्दिष्टाचा कवी आंधळे यांनी सहर्ष आनंद व्यक्त केलाय. सदर 'आई! मला जन्म घेऊ दे!' या स्त्रीभ्रूण हत्येच्या विरोधातील भावकवितेला प्रचंड जनाधार लाभला असून या कवितेचे यामुळेच तब्बल पंचेचाळीस भारतीय भाषेत व बोली भाषेत उत्स्फूर्त अनुवाद संपन्न झाले आहेत.सेवाभावी सामाजिक संस्था आणि सुधारकांनी गेल्या पंधरा वर्षात या कवितेचे अदमासे एक लाख पोस्टर प्रकाशित केलेत. यापूर्वी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ पुणे यांनी युवकभारतीच्या पाठ्यपुस्तकात सन २०१६ साली या कवितेला इयत्ता अकरावीकरिता समाविष्ट केले होते. तर गुजरात राज्यात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये 'गुजरात माध्यमिक आणि उच्चस्तर माध्यमिक शिक्षण बोर्ड गांधीनगर यांनी इयत्ता - १२ वी विज्ञान या बोर्डाच्या प्रश्न पत्रिकेत 'आई, मला जन्म घेऊ दे' ही संपूर्ण कविता प्रदर्शित करीत त्यावर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आले. परराज्यात खान्देशाच्या मराठी भाषिक कवीचे आणि कवितेचे यश निश्चितच उल्लेखनीय आहे.हे यश येथवरच थांबले नाही तर या कवितेवर प्रा. आत्माराम चिमकर एरंडोल, उच्च माध्यमिक शिक्षक चोपडेकर यांनी शोधनिबंधही सादर केले आहेत. जनसंवादी होणाऱ्या या कवितेला वेगवेगळ्या



वर्गासाठी अभ्यासक्रमात मिळालेले स्थान पाहता कवी प्रा. वा. ना. आंधळे यांचे मानवतावादी विचारवन्त तथा जेष्ठ संशोधक प्रोफेसर डॉ. म. सु. पगारे, डॉ. दीपक खरात, प्रा. महेश सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. अनिल लोहार, कवी ज्ञानेश्वर घुले,जेष्ठ कवी भगवान भटकर कवी निंबा पुना बडगुजर, कवी पी. जी. चौधरी सर, कवी विलास मोरे, रावसाहेब अरुण माळी, गणेश कुलकर्णी,प्रा. डॉ. बी. एफ. शेख यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## महेश इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग आष्टी येथे ४ जुलै रोजी

# भव्य कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राईव्ह

## ३० हून अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग

**आष्टी (प्रतिनिधी)**

ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि तांत्रिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी नोकरीची मोठी सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे महेश इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आष्टी आणि आनंद चॅरिटेबल ट्रस्टचे डिप्लोमा इन इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये भव्य 'कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राईव्ह २०२६' (रोजगार मेळावा) चे आयोजन करण्यात आले आहे.

या भव्य रोजगार मेळाव्यात देश- विदेशातील ३० पेक्षा अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून,विविध क्षेत्रांतील गुणवंत उमेदवारांची थेट मुलाखतींद्वारे निवड केली जाणार आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नामांकित उद्योगांमध्ये करिअर घडवण्याची संधी मिळणार असून स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळणार आहे.

- **अशी असेल निवड प्रक्रिया:**

कंपन्यांच्या गरजेनुसार भरती प्रक्रियेमध्ये लेखी परीक्षा,तांत्रिक मुलाखत एचआर मुलाखत आणि कौशल्य चाचणी आदी टप्प्यांचा समावेश असू शकतो. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार आकर्षक वेतन व इतर भत्ते देऊन करिअरची उत्तम संधी उपलब्ध करून दिली



- **या कॅम्पस ड्राईव्हमध्ये बी.ई. बी.टेक. पदवीधर, डिप्लोमा अभियंते, बीसीएस बीसीए बी.एस्सी. तसेच संबंधित शाखांतील पात्र उमेदवार सहभागी होऊ शकतात. यामध्ये प्रामुख्याने:**
- **माहिती तंत्रज्ञान**
- **उत्पादन ऑटोमोबाईल**
- **इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स & मेकॅनिकल**
- **सिव्हिल आणि बांधकाम क्षेत्र**
- **एआय अँड डेटा सायन्स**
- **सेवा उद्योग यांसह इतर विविध क्षेत्रांतील कंपन्या भरती प्रक्रिया राबविणार आहेत.**

जाणार आहे.सहभागी होणाऱ्या उमेदवारांनी येताना आपला अद्ययावत बायोडाटा पासपोर्ट आकाराचे फोटो, ओळखीचा पुरावा, सर्व शैक्षणिक गुणपत्रिका महाविद्यालयाचे ओळखपत्र व आवश्यक कागदपत्रांच्या मूळ व छायांकित प्रतींसह उपस्थित राहावे. इच्छुक उमेदवारांनी नाव नोंदणीसाठी प्रा. डोणे एल.एस.(मो. ९६०४२०९०४२) यांच्याशी संपर्क साधून ऑनलाइन नोंदणी करावी. तसेच इच्छुक कंपन्यांनाही उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार थेट कॅम्पस मुलाखती घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या रोजगार मेळाव्याचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट मार्फत करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना थेट उद्योग क्षेत्राशी जोडून रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रागीट एस.एस.,संगणक विभाग प्रमुख प्रा. सचिन विधाते आणि यंत्र विभाग प्रमुख प्रा.संजय बोडखे यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा विविध उद्योगांतील कंपन्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

# 42 लाखांची 'सफाई', बीडमध्ये 18 पैकी एकही नाला पूर्ण स्वच्छ नाही; रस्त्यांवर घाण पाणी

**बीड |** पावसाळ्यापूर्वी शहरातील नाल्या साफ करण्यासाठी बीड पालिकेने मार्च महिन्यात प्लॅन आखला. मोहिमेला प्रत्यक्ष जून महिन्यात सुरुवात झाली. घाई-गडबडीत नाल्यावरील अतिक्रमण तसेच व्यापाऱ्यांनी टाकलेले ढापे तसेच ठेवून वरवरची स्वच्छता मोहीम राबवली. गटारात ५ फुटांपर्यंत गाळ तसाच ठेवण्यात आला. या मोहिमेदरम्यान एकही नाला पूर्ण स्वच्छ करण्यात आला नाही. त्यामुळे पहिल्याच पावसात बीड शहरातील महत्त्वाच्या जालना रोडवर गटाराचे पाणी आले. गयानगर, शिंदेनगर, कॅनॉल रोड भागातही गटार तुंबून घाण पाणी रस्त्यावर आले. या घाणीतून नागरिकांना वाट काढावी लागली. त्यामुळे ४२ लाख पाण्यात गेले



आहेत.

यंदाच्या स्वच्छता मोहिमेत केवळ कागदोपत्री घोडे नाचवले गेल्याचे विदारक चित्र शहरातील प्रमुख रस्त्यांवर पाहायला मिळत आहे. कॅनॉल रोड, गजबजलेला जालना रोड, बसस्थानकाच्या पाठीमागील छत्रपती कॉलनी, बारकुल हॉस्पिटल ते थेट तहसील कार्यालय रोड, सम्राट चौक, गयानगर आणि चौरे इस्टेट या भागात नाले ओसंडून वाहत आहेत. गटारांचे पाणी रस्त्यावर आल्याने पादचाऱ्यांना आणि वाहनधारकांना दुर्गंधीयुक्त पाण्यातून कसरत करावी लागते. या वर्षी मान्सूनपूर्व कामांच्या टेंडरला उशीर करण्यात आला. Q मोहिमेतील १८ पैकी एकही नाला पूर्ण स्वच्छ का झाला नाही? A वर्क ऑर्डर झाल्यानंतर दोन-तीन दिवस गुत्तेदार बीडमध्ये आले. त्यानंतर नाही. Q आता टेंडर रद्द होणार का? A : गुत्तेदाराला नोटीस काढली जाईल. Q शहरातील नालेसफाई कधी होणार? A: गुत्तेदाराने पूर्ण नालेसफाई केली तर ठीक, अन्यथा वर्क ऑर्डर रद्द करून पालिकेच्या यंत्रणेद्वारे नालेसफाई केली जाईल.

# प्रतिपंढरपूर श्रीक्षेत्र आन्वा येथील मानाच्या दिंडीचे पंढरीकडे प्रस्थान

**आन्वा |** 'जावे पंढरीसी आवडे मानसी' या संतवचनाचा जयघोष करीत प्रतिपंढरपूर म्हणून ओळख असलेल्या भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र आन्वा येथून संत सद्गुरू श्री विठोबादादा महाराज चातुर्मास्ये, श्रीविठ्ठल-रुक्मिणी संस्थानची मानाची पायी दिंडी मंगळवारी दुपारी १२.३० वाजता पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठलनाम, 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष झाला. परिसर भक्तिमय झाला. श्रीसंस्थानचे पंधरावे विद्यमान पीठाधीश परमपूज्य सद्गुरू श्रीज्ञानेश्वर माउली महाराज चातुर्मास्ये यांच्या प्रमुख उपस्थितीत दिंडीला सुरुवात झाली. दिंडी सोहळा प्रमुख कैवल्य महाराज चातुर्मास्ये, राधेश्याम महाराज चातुर्मास्ये, नित्यानंद महाराज आदी उपस्थित होते.

या दिंडीला सुमारे २७२ वर्षांची परंपरा आहे. सन १७३० मध्ये संत सद्गुरू श्री विठोबादादा महाराज चातुर्मास्ये यांनी स्वतः सलग १२ वर्षे पायी वारी पूर्ण केली. त्यानंतर भगवान श्री पांडुरंग परमात्म्याच्या आज्ञेनुसार पंढरपूर येथे चातुर्मास कीर्तनसेवा सुरू केली. आषाढी ते कार्तिकी या काळात चातुर्मास सेवा, कीर्तनाची परंपरा सुरू झाली. गेल्या पंधरा पिढ्यांपासून ही परंपरा अखंड सुरू आहे. विद्यमान पीठाधीश दरवर्षी चार महिने पंढरपूर येथे वास्तव्य करून धार्मिक सेवा बजावतात. पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या तीरावर असलेल्या श्री चातुर्मास्ये महाराज मठात संतश्री विठोबादादा महाराज, सद्गुरू श्री मैराळ महाराज यांच्या समाधी आहेत. चातुर्मास काळात मठात दररोज काकडा भजन, श्रीमद्भागवत कथा, गाथा भजन, हरिपाठ होतो. सायंकाळी पीठाधीश महाराजांचे कीर्तन होते. या परंपरेला वारकरी संप्रदायात विशेष महत्त्व आहे.

यंदाची दिंडी श्रीक्षेत्र आन्वा येथून सिल्लोडकडे जाईल. पुढे आळंद, फुलंब्री, हर्सूल, नक्षत्रवाडी, कौटगाव असा मार्ग असेल. श्रीक्षेत्र पैठण, सोनविहीर, लाडजळगाव, मातोरी, बावी, उंबरविहीर येथे मुक्काम होईल. पुढे पारगाव घुमरा, जायभायवाडी, तिंत्रज, रत्नापूर, जुने डोमगाव, लोणी असा प्रवास असेल. श्रीक्षेत्र लहूळ, आष्टी मार्गे दिंडी पंढरपूरकडे जाईल. सहा जिल्ह्यांतून सुमारे ४५० किलोमीटरचा पायी प्रवास होईल. हा प्रवास २२ दिवसांत पूर्ण होईल. दिंडी २१ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दाखल होणार आहे. श्रद्धा, भक्ती, परंपरा, वारकरी संस्कृतीचा वारसा जपणारी ही मानाची दिंडी हजारो भाविकांसाठी प्रेरणा ठरत आहे.